नि.दि.दा.क्र. १७१/२०२१
निशाणी क्र. २५ व २७ वरील आदेश
CNRNo.MHNS2000181222021
देविदास वि. विश्वनाथ

## निशाणी क्र. २५ व २७ वरील आदेश

प्रस्तुतचा निशाणी क्र. २५ वरील अर्ज वादीचे जनरल मुखत्यारतर्फे मयत वादीचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी झालेला विलंब माफ होवून वारस अभिलेखावर घेण्यासाठी व निशाणी क्र. २७ वरील अर्ज हा मयत वादीचे वारस अभिलेखावर घेवून त्याद्रृष्टिने दाव्यात दुरूस्ती करण्याचा आदेश होण्यासाठी दाखल केले आहेत. वादी नामे देविदास संपत शिरसाठ हे दिनांक ०१.०२.२०२३ रोजी चांदगिरी, ता. जि. नाशिक येथे मयत झाले आहेत. त्यांचा मृत्यु दाखला मुदतीत मिळाला नसल्यामुळे वारस अभिलेखावर घेता आले नाहीत. प्रतिवादी हे वादीचे वारसांचे कब्जेउपभोगास हरकत करत असल्याने निशाणी क्र. २७ वरील अर्जात नमुद केल्याप्रमाणे वादीचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी विनंती करण्यात आली आहे. अर्जाचे पृष्ठयर्थ निशाणी क्र. २६ व २८ अन्वये प्रतिज्ञापत्र दाखल करण्यात आले आहेत.

२. प्रस्तुत अर्जास प्रतिवादी यांनी म्हणणे सादर केले की, योग्य तो कायदेशीर हुकुम व्हावा.

३. दोन्ही पक्षकारांतर्फे युक्तिवाद ऐकला. अभिलेख पाहीले.

४. निशाणी क्र. ३० सोबत फेरफार नोंद क्र. ७१५५, मौजे पंचाळे, ता. सिन्नर चा उतारा दाखल केला आहे. मयत वादीच्या मृत्यु प्रमाणपत्राची छायांकित प्रत निशाणी ३२ सोबत दाखल करण्यात आली आहे. सदर मृत्यु प्रमाणपत्राचे अवलोकन केले असता दिनांक ०१.०२.२०२३ रोजी वादी नामे देविदास संपत शिरसाठ हे मयत झाल्याचे दिसुन येते. सदर वादीस अर्जात नमुद वादी क्र. १ ते ४ हे वारसदार असल्याचे वादीतर्फे जनरल मुखत्यारधारकाने शपथेवर कथन करण्यात आले आहे. सबब, ते नाकारण्यास कोणतेही कारण उरत नाही. प्रस्तुत वादी मयत असल्याने त्यांचे वारस अभिलेखावर घेणे गरजेचे आहे. दावा हा निरंतर ताकीद हुकुमासाठी दाखल केला असुन प्रतिवादीचा हरकत—अडथळा वादीचे वारसांना चालू असल्याचे अर्जात कथन मांडले आहे. सबब, दावा अंतिमरीत्या निकाली काढण्यासाठी वादीचे वारस अभिलेखावर येणे गरजेचे आहे. सबब, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

**नि.दि.दा.क्र. १७१/२०२१**
**निशाणी क्र. २५ व २७ वरील आदेश**
**CNRNo.MHNS2000181222021**
**देविदास वि. विश्वनाथ**

**<u>आदेश</u>**

१. प्रस्तुतचे दोन्ही अर्ज प्रतिवादीला रक्कम रू. ३,००/— देण्याच्या अटीवर मंजूर करण्यात येतात.

२. वादीतर्फे जनरल मुखत्यारधारकाने मुदतीत दाव्यात दुरूस्ती करून दुरूस्त दाव्याची प्रत अभिलेखावर दाखल करून प्रतिवादीस दयावी.

ROHINI RAJENDRA KULKARNI
Digitally signed by ROHINI RAJENDRA KULKARNI
Date: 2025.03.19 17:36:59 +0530

दिनांक: १७.०३.२०२५

(आर.आर.कुलकर्णी)
सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर
सिन्नर